**FORM A**
**PUBLIC ANNOUNCEMENT**
(Under Regulation 6 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)

FOR THE ATTENTION OF THE CREDITORS OF **M/s SHRI KARVIR NIVASINI MAHALAXMI ISPAT PRIVATE LIMITED**

| **RELEVANT PARTICULARS** | | |
|---|---|---|
| 1. | Name of corporate debtor | **M/s Shri Karvir Nivasini Mahalaxmi Ispat Private Limited** |
| 2. | Date of incorporation of corporate debtor | 26/08/1993 |
| 3. | Authority under which corporate debtor is incorporated / registered | ROC - Pune |
| 4. | Corporate Identity No. / Limited Liability Identification No. of corporate debtor | U27104PN1993PTC073651 |
| 5. | Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor | A-6 MIDC Gokul Shirgaon, Kolhapur, Maharashtra, India, 416234 |
| 6. | Insolvency commencement date in respect of corporate debtor | August 18, 2026 (order received August 19, 2026) |
| 7. | Estimated date of closure of insolvency resolution process | February 15, 2027 |
| 8. | Name and registration number of the insolvency professional acting as interim resolution professional | Mr. Purusottam Behera<br>Reg.No: - IBBI/IPA-002/IP-P00940/2019-2020/12993<br>AFA Valid Till: December 31, 2026 |
| 9. | Address and e-mail of the interim resolution professional, as registered with the Board | Address: Flat No.402, Sai Prasad Building, Sion Kamgar CHS, Road No-29, Sion (East) Mumbai, Mumbai City, Maharashtra ,400022<br>**Email ID**: purusosbbj@yahoo.com |
| 10. | Address and e-mail to be used for correspondence with the interim resolution professional | **Correspondence address:** 402-403 Lotus Plaza Behind Laxmi Narayan Mandir, Venus Corner, Shahupuri, Kolhapur, Maharashtra - 416001<br>Process email id: ibc.knmpl@gmail.com |
| 11. | Last date for submission of claims | September 02, 2026 |
| 12. | Classes of creditors, if any, under clause (b) of sub-section (6A) of section 21, ascertained by the interim resolution professional | NA |
| 13. | Names of Insolvency Professionals identified to act as Authorised Representative of creditors in a class (Three names for each class) | NA |
| 14. | (a) Relevant Forms and<br>(b) Details of authorized representatives are available at: | a) Weblink: https://ibbi.gov.in/en/home/downloads<br>b) Not Applicable |

Notice is hereby given that the National Company Law Tribunal Mumbai Bench-VI, has ordered the commencement of a corporate insolvency resolution process of **M/s SHRI KARVIR NIVASINI MAHALAXMI ISPAT PRIVATE LIMITED** on August 18, 2026.

The creditors of **M/s SHRI KARVIR NIVASINI MAHALAXMI ISPAT PRIVATE LIMITED** are hereby called upon to submit their claims with proof on or before September 02, 2026 to the interim resolution professional at the address mentioned against entry No. 10.

The financial creditors shall submit their claims with proof by electronic means only. All other creditors may submit the claims with proof in person, by post or by electronic means.

Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.

**Sd/-**
**Purusottam Behera**
Interim Resolution Professional
**In the matter of M/s Shri Karvir Nivasini Mahalaxmi Ispat Private Limited.**
**Registration No:** IBBI/IPA-002/IP-00940/2019-20/12993
**AFA Valid upto: 31.12.2026**
IBBI Registered Address: Flat No.402, Sai Prasad Building, Sion Kamgar CHS, Road No-29, Sion (East) Mumbai ,Mumbai City ,Maharashtra ,400022
Email ID: purusosbbj@yahoo.com , ibc.knmpl@gmail.com

Date: August 20, 2026
Place: Mumbai

| सोने | चांदी |
|---|---|
| सांगली १,५४,९०० | २,३१,००० |

**अंडी भाव**

राष्ट्रीय अंडी समन्वय समिती (मिरज) दि. २० ऑगस्ट २०२६ ५६५ मुंबई (नेकरेट) - मिरज फाँड्री रेट (किरकोळ ८० रु. डझन)
ब्रॉयलर जिवंत पक्षी नंदा ग्रुप ११८ रुपये प्रतिकिलो

**शेअर बाजार**

- सेन्सेक्स : ७६,९०९.६८
- निफ्टी : २४,०७८.३०
- युएस डॉलर : ९५.७०
- युरो : १११.११

**जाता-जाता**




साहेब, 'वरकमाई' होतच नाही... अवैध धंदेवाल्यांकडे गेलो की, ते आपल्या पक्षाचे इलेक्टोरल बाँड दाखवतात...

# दुसऱ्याच्या कामाचे श्रेय लाटणाऱ्या अपयशी पडळकरांनी राजीनामा द्यावा

## तम्मनगौडा रवी पाटील; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली** : निवडणुकीत वारेमाप आश्वासन देणारे जतचे आ. गोपीचंद पडळकर यांनी एकही आश्वासन पाळलेले नाही. ते स्वतःचे नेतृत्व अपयशी ठरल्याने दुसऱ्यांच्या कामाचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी आमदारकीचा राजीनामा द्यावा, अशी मागणी सांगली जिल्हा परिषदेचे माजी सभापती व जतचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते तम्मनगौडा रवी पाटील यांनी पत्रकार बैठकीत केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे त्यांची तक्रार करणार असल्याचा इशाराही रवी पाटील यांनी दिला.

रवी पाटील यांनी आ. पडळकर यांच्या निवडणुकीतील घोषणा, विकास कामांमधील अपयश, पोकळ आश्वासने याचा जोरदार समाचार पत्रकार बैठकीत घेतला. नेतृत्व, कर्तृत्वमध्ये अपयशी ठरलेल्या पडळकर यांनी हिम्मत असेल तर स्वतः उत्तर द्यावे, असे आव्हानही रवी पाटील यांनी दिले.

ते म्हणाले, माडग्याळ येथे



तम्मनगौडा रवी पाटील

जिल्हा परिषदेच्या निधीतून उभारण्यात आलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे भूमिपूजन २२ ऑगस्टला नियोजित असताना आमदार पडळकर यांनी घाईघाईत तेथे जाऊन परस्पर उद्घाटन केले आहे. यापूर्वीही जत तालुक्यात एका प्राथमिक आरोग्य केंद्राचे त्यांनी अशाच प्रकारे उद्घाटन निवडणुकीपूर्वी केले आहे. आजतागायत तेथे एकही कर्मचारी अथवा वैद्यकीय अधिकारी नेमलेला नाही. अशा प्रकारे दुसऱ्याच्या कामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करणाऱ्या आमदार पडळकर यांनी राजीनामा द्यावा. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडेही त्यांच्याबद्दल तक्रार करणार आहे.

ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीवेळी पडळकरांनी जत तालुक्यात एमआयडीसी उभारण्याचा तसेच सुमारे साडेतीनशे कोटींची बांबू लागवड करण्याची घोषणा केली होती. निवडणुकीनंतर जलजीवन मिशनची कामे करण्याचे आश्वासन दिले होते. प्राणी संग्रहालयाचीही घोषणा केली आहे. मात्र यातील कोणतेही आश्वासन पूर्ण झालेले नाही. उलट तत्कालीन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी उमदी एमआयडीसीचा प्रस्ताव रद्द केल्याचे सहसंचालक पुणे यांना कळवल्याचे सांगितले होते. त्यामुळे आमदार म्हणून पडळकर यांचे नेतृत्व अपयशी ठरल्याचा आरोप रवी पाटील यांनी केला.

ते म्हणाले, की माडग्याळ येथील पशुवैद्यकीय दवाखाना जिल्हा परिषदेच्या निधीतून उभारला आहे. येत्या २२ तारखेला आ. जयंत पाटील तसेच माजी आ. विलासराव जगताप, जिल्हा परिषद अध्यक्ष संगीता पाटील यांच्या उपस्थितीत भूमिपूजन करण्याचे नियोजित होते. माझी पत्नी सावित्री रवी पाटील या मतदारसंघाची जिल्हा परिषद सदस्य तसेच कृषी व पशुसंवर्धन सभापती आहे. मात्र आमदार पडळकर यांनी बुधवारी तेथे जाऊन अधिकृतरित्या उद्घाटन केले. त्यावेळी पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्यही नव्हते.

आमदार पडळकर यांच्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार आहे, असे रवी पाटील यांनी सांगितले.

### जतला तहानलेले ठेवून मंगळवेढ्याला पाणी

गोपीचंद पडळकर हे जत तालुक्याचे आमदार आहेत, मात्र त्यांनी जत तालुक्याला तहानलेले ठेवून मंगळवेढ्याला पाणी दिले आहे. आजही जत तालुक्यात ८ गावे व ६६ वाडी-वस्त्यांवर टँकरने पाणी पुरवठा होत आहे. ते आमदार जतचे असले तरी देखरेख मंगळवेढ्याची करीत असल्याचा आरोप तम्मनगौडा रवी पाटील यांनी केला.

* **भावनगर** : गुजरातच्या भावनगर जिल्ह्यात विषारी दारूमुळे दोन जणांचा बळी गेला असून १९ जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



कुपवाड : येथे एका टेक्स्टाईल कंपनीला लागलेली आग आटोक्यात आणताना अग्निशमन दलाचे जवान.

# संजय इंडस्ट्रीजमधील टेक्स्टाईल कंपनीला भीषण आग

## यंत्रसामग्री, कच्चा-पक्का माल जळून खाक; सर्व कामगार सुखरूप

**केसरी वृत्तसेवा**

**कुपवाड** : अहिल्यानगर परिसरातील संजय इंडस्ट्रीज हद्दीत असलेल्या एका टेक्स्टाईल कंपनीतील तिसऱ्या मजल्यावर काल सकाळी भीषण आग लागली. आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने कारखान्यातील अत्याधुनिक यंत्रसामग्री, कच्चा व पक्का माल तसेच फॅक्टरीच्या शेडचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आगीचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही.

आगीची माहिती मिळताच सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका तसेच एमआयडीसी अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. माधवनगर ग्रामपंचायतीनेही आग आटोक्यात आणण्यासाठी पाण्याचा टँकर पाठविला होता. अग्निशमन जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले. सुरक्षा यंत्रणेने तत्परता दाखवत सर्व कामगारांना सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. कोणतीही जीवितहानी अथवा गंभीर दुखापत झालेली नाही.

आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट पसरले होते. त्यामुळे कारखान्याजवळ नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने काही काळ परिसरातील वीजपुरवठा खंडित करून वाहतूकही पर्यायी मार्गाने वळवली.

कुपवाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक आनंदराव घाडगे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीची पाहणी करून कारखान्यालगत जमलेल्या नागरिकांना सुरक्षित अंतरावर हलविण्याचे आदेश पोलीस कर्मचाऱ्यांना दिले. यावेळी आयुष हेल्पलाईन टीम आणि पै. चंद्रहार पाटील जीवरक्षक टीम देखील घटनास्थळी दाखल झाली होती. रात्री उशिरापर्यंत कुपवाड औद्योगिक वसाहत पोलिसांत तक्रार दाखल करायचे काम सुरू होते.

# यशोदा कदम यांचे निधन

## सोनसळमध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

**केसरी वृत्तसेवा**

**कडेगाव** : सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचे माजी आमदार मोहनराव



कदम यांच्या पत्नी यशोदा मोहनराव कदम (वय ८०) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या परिसरात 'आक्का' या नावाने परिचित होत्या. त्यांच्या निधनाने कदम कुटुंबीयांसह सोनसळ, चिंचणी आणि पलूस-कडेगाव परिसरात शोककळा पसरली.

काही दिवसांपासून श्वसनाचा त्रास होत असल्याने यशोदा कदम यांच्यावर पुणे येथील भारती रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान प्रकृतीत चढ-उतार होत असतानाच बुधवारी त्यांची प्राणज्योत मालवली. आमदार डॉ. विश्वजित कदम, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांच्यासह कुटुंबीय त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून होते.

चिंचणी (वाजेगाव) येथील त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांनी मोठी गर्दी झाली होती. भारती विद्यापीठाचे संस्थापक, महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांच्या त्या वहिनी होत. कदम कुटुंबातील नाती त्यांनी आयुष्यभर जिव्हाळ्याने जपली. कुटुंबासह समाजाच्या सुख-दुःखात सहभागी होत प्रेम, माया आणि आपुलकीचा आधार देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. माजी आमदार मोहनराव कदम यांच्या प्रदीर्घ राजकीय आणि सामाजिक वाटचालीत यशोदा कदम खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या.

चिंचणी येथे निवासस्थानी अंत्यदर्शनानंतर अंत्ययात्रा सोनसळकडे रवाना झाली. सोनसळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारावेळीही नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. शोकाकुल वातावरणात आणि साश्रूनयनांनी यशोदा कदम यांना अखेरचा निरोप देण्यात आला. त्यांच्या निधनाने कदम कुटुंबाचा मायेचा आधार हरपल्याची भावना उपस्थितांनी यावेळी व्यक्त केली.

त्यांच्या पश्चात पती माजी आमदार मोहनराव कदम, मुलगा माजी जिल्हा परिषद सदस्य शांताराम कदम, मुलगी शोभाताई महाडिक, नातू कडेगाव पंचायत समितीचे सभापती डॉ. जितेश कदम, पंचायत समिती सदस्य दिग्विजय कदम, आदित्य कदम, हर्षवर्धन कदम यांच्यासह मोठा परिवार आहे. रक्षाविसर्जन शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता सोनसळ येथील स्मशानभूमीत होणार आहे.

# जळगाव येथील घटनेच्या निषेधार्थ ग्रामसभांवर बहिष्कार

## ग्रामसेवक संघटनेचा इशारा

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली** : जळगाव जिल्ह्यात ग्रामसभेदरम्यान घडलेल्या वादग्रस्त घटनेच्या तसेच ग्रामपंचायत अधिकारी संवर्गावर विविध प्रकारे येणाऱ्या दबावाच्या निषेधार्थ, ग्रामसेवक संघटनेचा पुढील निर्णय होईपर्यंत ग्रामसभा घेण्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचे निवेदन जिल्हा कार्यकारिणीच्या निर्णयानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांना देण्यात आले.

जिल्ह्यात जिल्हा नियोजन समिती, जिल्हा परिषद तसेच आमदार-खासदार स्थानिक विकास निधी, जनसुविधा, नागरी सुविधा, दलित वस्ती सुधारणा आणि २५-१५ योजनांतून मोठ्या प्रमाणात विकासकामे मंजूर होतात. या कामांच्या निविदा प्रक्रियेत ठराविक ठेकेदारांना कामे देण्यासाठी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर पदाधिकारी अथवा संबंधितांकडून दबाव आणला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. नियमाप्रमाणे निविदा प्रक्रिया राबविल्यास संबंधितांच्या मर्जीतील ठेकेदारांना काम मिळेलच असे नाही. त्यामुळे तक्रारी, राजकीय दबाव आणि ब्लॅकमेलिंगच्या प्रकारांना ग्रामपंचायत अधिकारी सामोरे जात असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे पुढील निर्णय होईपर्यंत विविध विकासकामांच्या निविदा प्रक्रिया न राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## मलेशियातील तीन गुन्हेगार पंजाब पोलिसांच्या अटकेत

**चंडीगड** : कुख्यात दविंदर बंबिहा टोळीतील तीन गुन्हेगारांना मलेशियात पंजाब पोलिसांनी अटक केली. केंद्रीय संस्थेच्या मदतीने तिघांचे मलेशियातून भारतात हस्तांतर करणे सोपे झाल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

मूळचा फरीदकोटचा रहिवासी जसप्रीत सिंग (ऊर्फ जस बेहबल) आणि राजस्तानमधील श्रीगंगानगरचा अजय सिंग व पवनदीप सिंग, अशी गुन्हेगारांची नावे असल्याचे पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितले. त्यांना नवी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पंजाब पोलिसांनी अटक केली.

# नागपंचमी उत्सवात अश्लील नृत्य; १६ नागमंडळांवर पोलिसांची कारवाई

**केसरी वृत्तसेवा**

**शिराळा** : येथे दि.१७ रोजी झालेल्या नागपंचमीच्या उत्सवाच्या दरम्यान काही नागराज मंडळांनी मिरवणुकी दरम्यान मंडळासमोर महिलांचे नृत्य ठेवून अश्लील, बिभस्त नृत्य चालू ठेवले. हे नृत्य बंद करण्याची समज देऊन सुद्धा त्यांनी बंद केले नाही. त्यामुळे सोळा नागमंडळांवर शिराळा पोलिसांनी कारवाई केली.

यामध्ये एम कंपनी नागराज मंडळ, कोटेश्वर नागराज मंडळ, श्री नागराज मंडळ, रेणुका नागराज मंडळ, संयुक्त नागराज मंडळ, श्री गणेश नागराज मंडळ, ओम सिद्धी विनायक नागराज मंडळ, कीर्ती कुमार नागराज मंडळ, कचाड नागराज मंडळ, चव्हाटा नागराज मंडळ, चेतक नागराज मंडळ, नागाची तालीम नागराज मंडळ, एचटीएम नागराज मंडळ, फ्रेंड सर्कल नागराज मंडळ, क्रांती नागराज मंडळ, युवा साम्राज्य नागराज मंडळ या सोळा नागराज मंडळांवर कारवाई करण्यात आली आहे.

उर्वरित मंडळांवर कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच ध्वनी प्रदूषण करणाऱ्या मंडळांवरसुद्धा कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## पाच्छापूर सबस्टेशनमधून तीन लाखांची कॉपर वायर लंपास

**केसरी वृत्तसेवा**

**जत शहर** : जत तालुक्यातील पाच्छापूर येथील महावितरणच्या सबस्टेशनमधील डेल्टा ग्रुप ट्रान्सफॉर्मरमधून ७४० किलो कॉपर वायर अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. चोरीला गेलेल्या वायरची किंमत सुमारे २ लाख ९६ हजार रुपये आहे. ही घटना १६ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत महावितरणचे कनिष्ठ अभियंता आदित्य विजय हिरवे यांनी जत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. ट्रान्सफॉर्मर क्रमांक १२५८/३० मधील कॉपर वायर चोरीस गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## दिल्ली विमानतळावर ६८ लाखांची रोकड जप्त

**नवी दिल्ली** : दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीआयएसएफच्या जवानांनी दोन भारतीय प्रवाशांकडून ६८.५३ लाख रुपयांची बेहिशेबी रोकड जप्त केली. विमानतळावर सामानाची तपासणी सुरू असताना दोन्ही प्रवाशांना संशयावरून थांबविण्यात आले. हे दोघेही आसाममधील गुवाहाटी येथे जाणार होते.

# वाढीव घरपट्टी विरोधी कृती समितीची उद्या व्यापक बैठक

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली**: सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील वाढीव घरपट्टीच्या प्रश्नावर पुढील आंदोलनाची दिशा, नागरिकांच्या समस्या तसेच या संदर्भातील महत्त्वाची माहिती देण्यासाठी वाढीव घरपट्टी विरोधी कृती समितीची व्यापक महत्त्वाची माहिती बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता, कष्टकऱ्यांची दौलत, पंचमुखी मारुती रोड, खणभाग, सांगली येथे होणार आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील भांडवली मूल्यावर आधारित वाढीव घरपट्टीमुळे सर्वसामान्य नागरिक, मध्यमवर्गीय कुटुंबे, व्यापारी तसेच मालमत्ताधारकांवर आर्थिक भार वाढला आहे. या प्रश्नावर गेल्या काही महिन्यांपासून समितीच्या माध्यमातून विविध स्तरांवर पाठपुरावा व आंदोलन सुरू आहे. या बैठकीमध्ये वाढीव घरपट्टीबाबत वस्तुस्थिती, नागरिकांच्या अडचणी, पुढील आंदोलनाची दिशा, प्रशासनाकडे करण्यात येणारा पाठपुरावा आणि नागरिकांच्या हक्कांसाठी घेण्यात येणाऱ्या पुढील भूमिकेबाबत महत्त्वपूर्ण माहिती देण्यात येणार आहे.

त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच वाढीव घरपट्टीने भरडले गेलेले सर्व नागरिक यांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वाढीव घरपट्टी विरोधी कृती समिती यांच्या वतीने केले आहे.

# नाट्यगृह नूतनीकरणामुळे यंदाचा इचलकरंजी फेस्टिव्हल स्थगित

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : इचलकरंजी फेस्टिव्हल २०२६ यंदा नाट्यगृहाच्या नूतनीकरणाच्या कामामुळे स्थगित ठेवण्यात आला आहे, अशी माहिती इचलकरंजी फेस्टिव्हलच्या संयोजिका मोश्मी आवाडे यांनी दिली.

गणेशोत्सव आणि इचलकरंजी फेस्टिव्हल हे गेल्या ३० वर्षांपासून एक समीकरण बनले आहे. पुणे फेस्टिव्हलच्या धर्तीवर माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे यांनी इचलकरंजी फेस्टिव्हलची सुरुवात केली. या माध्यमातून स्थानिक कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळाले. शहर व परिसरातील अनेक कलाकारांनी या फेस्टिव्हलमधून आपल्या कलेला वाव देत यशाची उंच भरारी घेत इचलकरंजीच्या नावलौकिकात भर घातली आहे. आता आमदार राहुल आवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृह येथे इचलकरंजी फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते. मात्र, यंदा नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे काम सुरू असल्याने इचलकरंजी फेस्टिव्हल २०२६ स्थगित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, अनंत चतुर्दशीदिनी २५ सप्टेंबर रोजी झेंडा चौक येथे इचलकरंजी फेस्टिव्हलच्या वतीने सार्वजनिक विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या गणेश मंडळांना मानाची पान-सुपारी देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे, असेही मोश्मी आवाडे यांनी सांगितले.

यावेळी शेखर शहा, अहमद मुजावर आदी मान्यवर उपस्थित होते.

## उदगावमध्ये सुगंधीत तंबाखुची वाहतूक; आगरच्या एकावर गुन्हा

**केसरी वृत्तसेवा**

**जयसिंगपूर** : उदगाव (ता. शिरोळ) येथील शिरोळ मार्गावर सुगंधीत तंबाखु, पान मसाला, गुटखा विक्री करण्याच्या उद्देशाने लुकमान समशेर गवंडी (वय ५४, रा. गवंडी मळा, मौजे आगर, ता. शिरोळ) हा दुचाकीवरून वाहतूक करीत असताना जयसिंगपूर पोलिसांनी बुधवारी सकाळी कारवाई केली. त्याच्याकडून पान मसाला, सुगंधीत गुटखा यासह दुचाकी असा ५२ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याबाबतची फिर्याद पो. कॉ.रहिमान शेख यांनी जयसिंगपूर पोलिसांत दिली.

## निधन वार्ता

### खाशीबाई जाधव



**कुंडल** : येथील खाशीबाई यशवंत जाधव (वय ८७) यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रतिनिधी हायस्कूल, कुंडलचे माजी मुख्याध्यापक तसेच शिक्षण सेवक सोसायटी, सांगलीचे माजी चेअरमन सी. वाय. जाधव यांच्या त्या मातोश्री होत. रक्षाविसर्जन गुरुवार, दि. २० रोजी सकाळी १० वाजता कुंडल येथील स्मशानभूमीत होणार आहे.

### ताराबाई तडाखे



**मांगले** : मांगले (ता. शिराळा) येथील ताराबाई निवृत्ती तडाखे (वय ७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या अनिल तडाखे यांच्या आई होत्या. रक्षाविसर्जन शुक्रवार, दि. २१ रोजी सकाळी १० वाजता मांगले येथे आहे.

### संपतराव पाटील



**मांगले** : येथील प्रगतशील शेतकरी संपतराव सर्जेराव पाटील (वय ६५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, दोन मुली, आई, भाऊ, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन गुरुवार, दि. २० रोजी सकाळी १० वाजता मांगले येथे आहे.

**केसरी**

खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहेत.

मिरज ग्रामीण, आष्टा आणि कडेगाव

- कोणत्याही शाखेचा पदवीधर.
- मराठी भाषेची उत्तम जाण आवश्यक.
- राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विषयांची जाण असावी.
- दैनिकातील प्रतिनिधी/वार्ताहर पदाचा अनुभव असावा.
- कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

इच्छुकांनी आपले अर्ज ७ दिवसांच्या आत sanglikesari@gmail.com या ई-मेलवर पाठवावेत.

### फॉर्म - अ
### सार्वजनिक सूचना

(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निवारण प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या विनियम ६ अन्वये)

**मेसर्स श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी इस्पात प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंच्या माहितीसाठी**

तपशील

| | | |
|---|---|---|
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | मेसर्स श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी इस्पात प्रायव्हेट लिमिटेड |
| २ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख | २६/०८/१९९३ |
| ३ | ज्या प्राधिकरणांतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणी झाली आहे | आरओसी पुणे |
| ४ | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U27104PN1993PTC073651 |
| ५ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि मुख्य कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | A-6, MIDC गोकुळ शिरगाव, कोल्हापूर, महाराष्ट्र, भारत, ४१६२३४ |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदाराबाबत दिवाळखोरी प्रक्रिया सुरू झाल्याची तारीख | १८ ऑगस्ट २०२६ (आदेश १९ ऑगस्ट २०२६ रोजी प्राप्त) |
| ७ | दिवाळखोरी निवारण प्रक्रिया पूर्ण होण्याची अंदाजित तारीख | १५ फेब्रुवारी २०२७ |
| ८ | अंतरिम निवारण व्यावसायिक म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | श्री. पुरुषोत्तम बेहरा नोंदणी क्रमांक : IBBI/IPA-002/IP-P00940/2019-2020/12993 AFA ची वैधता: ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत |
| ९ | बोर्डाकडे नोंदणीकृत असलेला अंतरिम निवारण व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ता: फ्लॅट क्र. ४०२, साई प्रसाद बिल्डिंग, सायन कामगार सीएचएस, रोड क्र. २९, सायन (पूर्व), मुंबई, मुंबई शहर, महाराष्ट्र - ४०००२२. ईमेल आयडी: purusosbbj@yahoo.com |
| १० | अंतरिम निवारण व्यावसायिकाशी पत्रव्यवहारासाठी वापरायचा पत्ता आणि ई-मेल | पत्रव्यवहाराचा पत्ता : ४०२-४०३ लोटस प्लाझा, लक्ष्मी नारायण मंदिराच्या मागे, व्हीनस कॉर्नर, शाहूपुरी, कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६००१. प्रक्रिया ईमेल आयडी: ibc.knmpl@gmail.com. |
| ११ | दावे सादर करण्याची अंतिम तारीख | २ सप्टेंबर २०२६ |
| १२ | अंतरिम निवारण व्यावसायिकाने निश्चित केलेले, कलम २१ च्या उप-कलम (६ए) च्या खंड (ब) अंतर्गत येणारे धनकोंचे वर्ग (असल्यास) | लागू नाही |
| १३ | धनकोंच्या वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी निवडलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे) | लागू नाही |
| १४ | (अ) संबंधित फॉर्म्स आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत : | अ) वेबलिंक: https://ibbi.gov.in/en/home/downloads ब) लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई बेंच VI ने १८ ऑगस्ट २०२६ रोजी 'मेसर्स श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी इस्पात प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निवारण प्रक्रियेस सुरुवात करण्याचे आदेश दिले आहेत.

'मेसर्स श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी इस्पात प्रायव्हेट लिमिटेड' च्या धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह २ सप्टेंबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी, नोंद क्र. १० समोर नमूद केलेल्या पत्त्यावर 'अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल' यांच्याकडे सादर करावेत.

वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारेच सादर करावेत. इतर सर्व धनको त्यांचे दावे पुराव्यासह प्रत्यक्ष, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सादर करू शकतात. दाव्यासाठी खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

सही/-
**पुरुषोत्तम बेहरा,**
**अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल**
**'मेसर्स श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी इस्पात प्रायव्हेट लिमिटेड' यांच्या प्रकरणात.**
नोंदणी क्रमांक : IBBI/IPA-002/IPA-00940/2019-20/12993
AFA वैध: ३१.१२.२०२६ पर्यंत

दि. २० ऑगस्ट २०२६
ठिकाण : मुंबई